॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Phone: (02462) 215294**
**Fax : (02462) 215520**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: directorboee@srtmun.ac.in**

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५–२६/८४४० दिनांक : ०३/०२/२०२६

## महत्त्वाचे परिपत्रक उन्हाळी–२०२६ (परीक्षा शुल्क व आवेदनपत्राबाबत)

**प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२६ पदवी (सर्व B.A./B.Com./B.Sc./BCA/BCS and All B.Voc. etc.) व पदव्युत्तर (NEP-2020 Pattern) (सर्व M.A./M.Com./M.Sc./MCA and and All M.Voc. etc.)**

**परीक्षेकरिता परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ तसेच न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपपरिसर लातूर, उपपरिसर परभणी, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट व प्रस्तुत विद्यापीठ संकुले यांना कळविण्यात येते की, पदवी (सर्व **B.A./B.Com./B.Sc./BCA/BCS and All B.Voc. etc.**) व पदव्युत्तर **(NEP-2020 Pattern) (सर्व M.A./M.Com./M.Sc./MCA and All M.Voc. etc.)** अभ्यासक्रमांच्या उन्हाळी–२०२६ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरिता सूचना खालीलप्रमाणे आहेत.

०१) विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाचा दिनांक :

**अ) नियमित शुल्कासह महाविद्यालयात आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक २८/०२/२०२६.**

ब) रु.१००/– विलंब शुल्कासह महाविद्यालयामध्ये परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम **दिनांक ०७/०३/२०२६.**
**('अ' व 'ब' नुसार परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.)**

क) दिनांक ०९/०३/२०२६ ते दिनांक ११/०३/२०२६ पर्यंत नियमित व विलंब शुल्कासह प्रतिदिवस रु.५०/– अतिविलंब शुल्क आकारून महाविद्यालयातच सदर परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारून दिनांक १२/०३/२०२६ रोजीचा धनाकर्ष काढावा किंवा NEFT/RTGS करावे व दिनांक १३/०३/२०२६ रोजी आवेदनपत्रे विद्यापीठात सादर करावेत.

०२) महाविद्यालयांनी 'अ' व 'ब' नुसार स्वीकारलेले परीक्षा आवेदनपत्रांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा **DD/NEFT/RTGS** हे **B.A., B.Com., B.Sc.** इत्यादी असे विद्याशाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे **'वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड'** यांच्या नावे काढावा. तो **DD/NEFT/RTGS दिनांक ०९/०३/२०२६** किंवा त्यापूर्वीच्या दिनांकाचा असणे आवश्यक आहे अथवा खालीलप्रमाणे **IDBI** बँकेच्या खात्यामध्ये अभ्यासक्रमनिहाय/विद्याशाखानिहाय **NEFT/RTGS** द्वारे **दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत** भरणा करावा. धनाकर्ष किंवा **NEFT/RTGS** विहित दिनांकानंतर काढल्यास १० दिवसांपर्यंत अभ्यासक्रमनिहाय प्रतीदिन रु.५००/– तर १० दिवसांनंतर अभ्यासक्रमनिहाय प्रतीदिन रु.१,०००/– विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**DD/NEFT/RTGS द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा शुल्काचा DD/NEFT/RTGS कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त काढू नये. तसे केल्यास अतिरिक्त असलेली रक्कम इतरत्र वर्ग केली जाणार नाही किंवा परत केली जाणार नाही.**

**Bank Details for DD/NEFT/RTGS/Online Payment:**
**Name of the A/c Holder: Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**
**Name of Bank: IDBI Bank, Nanded — IFSC Code: IBKL0000500 — A/c No.500104000028422**

०३) वरीलप्रमाणे सर्व अभ्यासक्रमांची **परीक्षा आवेदनपत्रे ही ऑनलाईन** पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. **पदवी व पदव्युत्तर** अभ्यासक्रमांच्या परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल. परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून **दोन प्रतींमध्ये** परीक्षा आवेदनपत्रांसोबत सादर करण्यात यावी.

**महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्रे व विहित शुल्काचा DD/NEFT/RTGS सह विद्यापीठात सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | दिनांक | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१. | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १२२ व त्यापुढील सर्व) | १०/०३/२०२६ | परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. |
| ०२. | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ११२–१२१) | ११/०३/२०२६ | |
| ०३. | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १०१–१११) | १२/०३/२०२६ | |
| ०४. | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २२२ व त्यापुढील सर्व) | १०/०३/२०२६ | उपपरिसर परभणी, प्रस्तुत विद्यापीठ. |
| ०५. | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २१२–२२१) | ११/०३/२०२६ | |
| ०६. | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २०१–२११) | १२/०३/२०२६ | |
| ०७. | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३२२ व त्यापुढील सर्व) | १०/०३/२०२६ | उपपरिसर लातूर, प्रस्तुत विद्यापीठ. |
| ०८. | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३१२–३२१) | ११/०३/२०२६ | |
| ०९. | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३०१–३११) | १२/०३/२०२६ | |

०४) वरीलप्रमाणे विहित दिनांकास परीक्षा आवेदनपत्रे सादर न केल्यास महाविद्यालयास प्रति दिन–प्रति विद्यार्थी रु.२/– किंवा रु.१,०००/– यापैकी जे जास्त असेल, ते विलंब शुल्क आकारण्यात येईल.

०५) परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क रु.०५/– स्वतंत्रपणे आकारण्यात यावे.

०६) प्रथम वर्ष (Sem-I & II), द्वितीय वर्ष (Sem-III & IV) व तृतीय वर्षासाठी (Sem-V & VI) स्वतंत्र परीक्षा आवेदनपत्र भरण्यात यावे. तसेच नियमित (Regular) व अनियमित (Backlog) परीक्षांच्या आवेदनपत्रांचे स्वतंत्र गठ्ठे बांधण्यात यावेत.

०७) परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना प्रथम नियमित (Regular) विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे व त्यानंतर अनियमित (Backlog) विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे याप्रमाणे वर्गनिहाय सादर करावेत.

०८) परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय नियमित/ठरावीक व तासिका तत्त्वावरील चार सत्र शिकविण्याचा अनुभव असलेल्या प्राध्यापकांची यादी (Course, College Code, College Name, Subject, Professor Name, Mobile No., e-mail ID) (संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राच्या छायांकित प्रतीसह) Excel File मध्ये भरून संबंधित विभागाच्या e-mail ID वर पाठवावी.

०९) परीक्षा आवेदनपत्रे अग्रेषित करताना महाविद्यालयातील अभ्यासक्रम व त्यातील संबंधित विषयास संलग्निकरण आहे काय? व हा विषय संबंधित महाविद्यालयात चालू आहे काय? तसेच शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता संलग्निकरण शुल्क भरलेले असल्याची खात्री करूनच परीक्षा आवेदनपत्रे सादर करावीत. तसेच मा. संचालक, क्रीडा विभाग, मा. संचालक, रा.से.यो., मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग तसेच संलग्निकरण विभागाकडून महाविद्यालयांनी आवश्यक ते शुल्क भरलेले आहे, याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्याशिवाय त्या महाविद्यालयाची परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, तसेच याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. उशिराने वरीलप्रमाणे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्यास नियमाप्रमाणे (सूचना क्र. ४ प्रमाणे) परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारताना विलंब शुल्क आकारले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

१०) उन्हाळी–२०२६ च्या परीक्षेसाठी सुधारित परीक्षा शुल्काप्रमाणे परीक्षा शुल्क घेण्यात यावे. (सुधारित परीक्षा शुल्काचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

११) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र सादर करताना उत्तीर्ण झालेल्या मागील सर्व सत्रांच्या गुणपत्रिकेची छायाप्रत जोडणे अनिवार्य आहे.

**१२) पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून NEP-2020 Pattern लागू झाल्यामुळे त्यापूर्वीच्या CBCS Pattern च्या जुन्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे परीक्षेच्या तीन संध्या उपलब्ध राहतील. परीक्षेच्या तीन संधी संपल्यानंतर CBCS जुन्या अभ्यासक्रमांतील एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी सध्या चालू असलेल्या NEP-2020 Pattern च्या नवीन अभ्यासक्रमांनुसार सर्व विषय घेऊन परीक्षा आवेदनपत्रे भरणे अनिवार्य आहे.**

| Syllabus Year | Semester | Chance-1 | Chance-2 | Chance-3 |
|---|---|---|---|---|
| 2019-20 | I & II | Winter-2024 | Summer-2025 | Winter-2025 |
| 2020-21 | III & IV | Winter-2025 | Summer-2026 | Winter-2026 |
| 2021-22 | V & VI | Winter-2026 | Summer-2027 | Winter-2027 |

(संदर्भ : परिपत्रक क्र.परीक्षा/पदवी कला/२०२४–२५/४११३, दिनांक ०६/०३/२०२५)

१३) परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना त्यासोबत विद्यार्थ्यांची ABC-ID रजिस्ट्रेशन केल्याची यादी सादर करावी. त्याशिवाय परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

१४) दिनांक २५ जुलै २०२३ रोजी झालेल्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील विषय क्र.१३–२१/२०२३ मध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांकडून अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्राच्या परीक्षा आवेदनपत्र व शुल्कासोबत पदवी प्रमाणपत्र शुल्क रु.१९०/–घेण्यात यावेत, असे ठरले आहे. याकरिता Online Link विद्यापीठाच्या वेबसाईटवर Convocation शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. **(केवळ उन्हाळी परीक्षेसाठी लागू.)**

**१५) जे विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रमाच्या, अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी प्रमाणपत्रासाठी आवेदनपत्रे भरणार नाहीत, त्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. (केवळ उन्हाळी परीक्षेसाठी लागू.)**

तरी वरील सूचनांची नोंद घेऊन, ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

**प्र. संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. प्र. वित्त व लेखाअधिकारी यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, लातूर व परभणी उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
४. मा. संचालक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, जि. नांदेड.
५. सर्व विभागप्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६. सीनिअर प्रोग्रामर, संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.